असा. क्र. ३१ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८


सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

प्राधिकृत प्रकाशन

**सोमवार, ऑगस्ट ६, २००७/श्रावण १५, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**


## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.**—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | २५१-२५२ |


दिनांक ४ ऑगस्ट २००७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ६ ऑगस्ट २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९६६ चा महा. ४१.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.



[किंमत : रुपये ९.००]

सन १९६६ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ११० ची सुधारणा.

२. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम ११० मध्ये, पोट-कलम (२) मधील,— १९६६ चा महा. ४१.

(क) " दोन पैशांहून अधिक नसेल " या मजकुराऐवजी " दहा पैशांहून अधिक नसेल " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) " एक पैशाहून अधिक नसेल " या मजकुराऐवजी " पाच पैशांहून अधिक नसेल " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई